संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती , अंतर्गत

सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, संत तुकाराम चौक , अकोला ( २१४ )

राष्ट्रीय सेवा योजना

विशेष श्रमसंस्कार शिबीर ( शैक्षणिक सत्र २०२५ -२०२६ )

कालावधी – दि. ०६/०२ /२०२६ ते १३ /०२/२०२६

दत्तक ग्राम येवता , ता . जि . अकोला

## निबंधात्मक अहवाल

सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला यांचे वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर धम्मभूमी विपश्यना केंद्र कुशीनगर, दत्तक ग्राम येवता, ता. जि. अकोला येथे महाविद्यालयाचे संस्थापक सचिव मा. श्री . बी. पी. पवार, प्राचार्य डॉ. अंबादास पांडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नेमीचंद एफ चव्हाण, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. संगिता तिहिले व रासेयो सल्लागार समितीचे सर्व सभासद यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले .

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत "शाश्वत विकासासाठी युवा: पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास ", बेटी बचाओ बेटी पढाओ, माझा कचरा माझी जबाबदारी, स्वच्छता अभियान, स्मशानभूमी सौन्दर्यीकरण, वृक्ष संवर्धन, वृक्षारोपण असे विविध उपक्रम या शिबिराद्वारे राबविण्यात आले.

**दि. ०६ /०२/२०२६**

शुक्रवार- दि. ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी दत्तक ग्राम येवता येथील धम्मभूमी विपश्यना केंद्रामध्ये शिबिराची पूर्व तयारी व परिसर स्वच्छता करण्याकरिता प्रस्थान करण्यात आले. शिबीर परिसर स्वच्छ केल्यानंतर संध्याकाळी 'पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास' हा प्रकल्प राबविण्यासाठी काही गावकरी आणि स्वयंसेवकाच्या मदतीने प्रकल्प स्थळाची पाहणी करण्यात आली.

**दि. ०७ /०२/२०२६**

शनिवार- दि. ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास " प्रकल्पासाठी श्रमदान करण्यात आले. दु. ३.०० वाजता विशेष शिबिराच्या उद्घाटनासाठी उद्घाटक म्हणून सौ. वंदनाताई शिरसाट, सरपंच येवता, प्रमुख पाहुणे डॉ. सुधीर कोहचाडे, रासेयो जिल्हा समन्वयक, अकोला हे उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक सचिव मा. बी.पी. पवार, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. जयंत बोबडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास पांडे, उपसरपंच श्री. गोपाल हागे, ग्रामसेवक ज्योती आठवले, सौ. संतोषी वाडेकर ग्रा.पं. सदस्या येवता, मोहन मोहोड, धम्मकिर्ती गोपनारायण, अक्षय जायले, सम्राट सरकटे, कार्यक्रम अधिकारी प्रा. एन. एफ. चव्हाण, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. संगिता तिहिले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. शिबिरार्थींच्या प्रसन्न व उत्साहवर्धक सहभागाने उद्घाटन सोहळा आनंदात पार पडला. रात्री ९.०० वाजता रासेयो चमूच्या मदतीने' माझा कचरा माझी जबाबदारी' या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले.

**दि. ०८ /०२/२०२६**

रविवार दि.०८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास " प्रकल्पासाठी श्रमदान करण्यात आले. दुपारी ३.०० ते ५.00 पर्यंत विशेष शिबिराच्या बौद्धिक सत्रात " पर्यावरण संवर्धन काळाची गरज " या विषयावर डॉ. अनंत राठोड यांनी तर

S. SCIENCE & U.K. COMM. COLLEGE AKOLA

Scanned with OKEN Scanner

" ग्राहक संरक्षण कायदे" या विषयावर डॉ. डी.के.राठोड, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, बोरगांव मंजू यांनी मार्गदर्शन केले. रात्री ९.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये स्वयंसेवकांनी वादविवाद आणि वकृत्व स्पर्धेमध्ये आपल्या कलेचे सादरीकरण केले.

**दि. ०९ /०२/२०२६**

सोमवार- दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास " प्रकल्पासाठी श्रमदान करण्यात आले. दुपारी ३.०० ते ५.00 पर्यंत विशेष शिबिराच्या बौद्धिक सत्रात " संत गाडगेबाबांचे अंधश्रध्दा निर्मुलनाविषयी विचार आणि कार्य " या विषयावर रोहन बुंदेले, (आदर्श विद्यार्थी, रासेयो संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) यांनी तर आरोग्य विषयक मार्गदर्शन आणि रक्ताच्या सर्व तपासण्या या कार्यक्रमात आरोग्य विभाग, बार्शीटाकळी, जि.अकोलाच्या टीमने आणि डॉ. प्रभाकर तिडके (समुपदेशक )यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी गावातील शेकडो लोकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या रक्ताच्या वेगवेगळ्या तपासण्या यावेळी करण्यात आल्या. डॉ. रात्री ९.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये "नृत्य आणि गायन " शिबिरार्थीने सादर केले.

**दि. १० /०२/२०२६**

मंगळवार- दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास " प्रकल्पासाठी श्रमदान करण्यात आले. दुपारी ३.०० वाजता विशेष शिबिराच्या बौद्धिक सत्रात "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास " या विषयावर डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मृदा विभाग प्रमुख, डॉ. शाम जाधव यांनी तर " आधुनिक शेती आणि शेतीपूरक जोडधंदे" या विषयावर डॉ. दारासिंग राठोड, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी मार्गदर्शन केले. रात्री ९.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये "येवता येथील भजन मंडळी यांनी भक्तीपर आणि प्रबोधनात्मक भजने सादर केली."

**दि. ११ /०२/२०२६**

बुधवार- दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत येवता येथील स्मशानभूमीतील "वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन " प्रकल्पासाठी श्रमदान करण्यात आले. दुपारी ३.०० ते ५.00 पर्यंत विशेष शिबिराच्या बौद्धिक सत्रात "बालविवाह मुक्त भारत " या विषयावर प्रा. पद्माकर सदांशिव सरांनी मार्गदर्शन केले, तर "भारतीय संविधानाची मुल्ये" या विषयावर डॉ.राधा मुरुमकार आणि प्रा. संदीप कुऱ्हाडे यांनी मार्गदर्शन केले. रात्री ९.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये शिबिरार्थी आणि प्राध्यापकांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या.

**दि. १२ /०२/२०२६**

गुरुवार- दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत "वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान" प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. यावेळी "माझा कचरा माझी जबाबदारी " या उपक्रमांतर्गत दत्तक ग्राम येवता येथील चौक, स्मशानभूमी, मंदिर, शाळा, रस्ते, दलित वस्ती, बौद्ध विहार येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. दुपारी ३.००ते ५.00 पर्यंत विशेष शिबिराच्या बौद्धिक सत्रात "पं.दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानवतावाद " या विषयावर डॉ.विकास राठोड, इंग्रजी विभाग प्रमुख, मलकापूर यांनी तर" व्यक्तिमत्त्व विकास" या विषयावर डॉ. वैशाली मुने, समुपदेशक, अकोला यांनी मार्गदर्शन केले. रात्री ९.०० वा. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये शिबिरार्थींनी अंधश्रध्दा निर्मुलन या विषयावर नाटिका सादर केली.

SHRI N. ARTS SCIENCE & U.K. COMM COLLEGE AKOLA

Scanned with OKEN Scanner

## दि. १३ /०२/२०२६ शिबिराचा समारोपीय सोहळा

शुक्रवार- दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत प्रभात फेरी आणि रस्ते साफ करण्यात आले. यावेळी येवता येथील ग्रामस्थांचे भरपूर सहकार्य लाभले. नंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास पांडे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख अतिथि सरपंच वंदनाताई सिरसाठ यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या कार्यक्रमामध्ये श्री. पी.एस.देवकर(कृषि मंडल अधिकारी), श्री. राजेश पातोंड (सहायक कृषि अधिकारी), उपसरपंच श्री. गोपाल हागे, राष्ट्रपाल सरकटे (तंटामुक्ती अध्यक्ष), जेष्ठ नागरिक विठ्ठलराव हागे, धम्मकिर्ती गोपनारायण,अक्षय जायले, सम्राट सरकटे, मोहन मोहोड आणि निमंत्रित गावकरी यांची उपस्थिती होती. यावेळी प्रियांका जामनिक, निदा हुसेन, आदित्य कांबळे, आनंद राठोड, आदिश्री हिरुरकर या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या शिबीराच्या यशस्वितेकरिता स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. या शिबीराचे फलित म्हणजे विध्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साधने, त्यांना विचारमंच उपलब्ध करून देणे, त्यांची बौद्धिक ऊंची वाढविणे,ग्रामीण जीवनाशी सुसंगत होणे, सेवाभाव निर्माण होणे, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्व, कर्तुत्व, वक्तृत्व, दातृत्व, सामाजिक भान निर्माण व्हावे यासाठी शिबीराच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या सात दिवसीय निवासी शिबीरामध्ये स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

रासेयो कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
National Service Scheme
Sudhakarrao Naik Arts &
Umashankar Khetan Commerce
College,AKOLA

S.N. ARTS SCIENCE & U.K. COMM. COLLEGE AKOLA

प्राचार्य
Principal
Sudharkarrao Naik Arts,
Science & Umashankar Khetan
Commerce College, Akola